# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांकः02.08.2024** **वारःशुक्रवार**

---

1. अनुसूचित जाती आणि जमातीच्या राखीव कोट्यात उपवर्गवारी करण्यास हरकत नाही - सर्वोच्च न्यायालयाचा निर्वाळा
2. वर्ल्ड ॲग्रीकल्चर फोरमचं दुसरं जागतिक कृषी पारितोषिक महाराष्ट्राला जाहीर
3. लोकमान्य टिळक यांच्या पुण्यतिथीनिमित्त; तसंच लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त राज्यभरातून अभिवादन आणि
4. महाराष्ट्राचा नेमबाज स्वप्नील कुसाळे याची पॅरिस ऑलिंपिकमध्ये ऐतिहासिक कामगिरी; राज्य सरकारकडून एक कोटी रुपयांचं पारितोषिक जाहीर

**सर्वोच्च न्यायालय**

अनुसूचित जाती आणि जमातीच्या राखीव कोट्यामध्ये आणखी उपवर्गवारी करायला हरकत नाही, असा निर्वाळा सर्वोच्च न्यायालयानं दिला आहे. सरन्यायाधीश न्यायमूर्ती धनंजय चंद्रचूड यांच्या अध्यक्षतेखालच्या 7 न्यायाधीशांच्या घटनापीठानं काल हा निर्णय दिला. अनुसूचित जाती आणि जमातींमध्येही आर्थिक आणि सामाजिक स्तरांमधे प्रचंड विविधता आहे; त्यामुळे सर्व प्रकारच्या मागास वर्गांना एकाच गटात आरक्षण देणं योग्य नाही असं न्यायालयानं म्हटलं आहे. त्याचं प्रमाण ठरवण्याचा अधिकार राज्य सरकारांना असून शिक्षण आणि नोकरीत अशा प्रकारचं आरक्षण त्यांना देता येईल, असं न्यायालयानं स्पष्ट केलं.

**संसद**

केंद्रीय गृह राज्यमंत्री नित्यानंद राय यांनी काल लोकसभेत आपत्ती व्यवस्थापन सुधारणा विधेयक सादर केलं. 2005 च्या आपत्ती व्यवस्थापन कायद्यात बदल करून राष्ट्रीय आणि राज्य आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणांची कार्यपद्धती बळकट करण्याची तरतूद या विधेयकात आहे. रेल्वे मंत्रालयाच्या अनुदानाच्या मागणीवर लोकसभेत झालेल्या चर्चेला काल रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव यांनी उत्तर दिलं. देशात रेल्वे अपघाताच्या घटना रोखण्यासाठी सरकार वचनबद्ध असून, यूपीए सरकारच्या काळात देशात दरवर्षी साधारण 171 अपघात होत असत; त्या तुलनेत आता रेल्वे अपघातांची संख्या 68 टक्क्यानी कमी झाल्याचं ते म्हणाले.

**महाराष्ट्र पुरस्कार**

वर्ल्ड ॲग्रीकल्चर फोरमचं या वर्षासाठीचं दुसरं जागतिक कृषी पारितोषिक महाराष्ट्राला जाहीर झालं आहे. फोरमच्या अध्यक्षांनी पत्राद्वारे याबाबत माहिती दिली. या पुरस्कारासाठी राज्यातील पर्यावरण रक्षण, अन्न सुरक्षा यांच्या माध्यमातून घेतल्या गेलेल्या शाश्वत विकास धोरणांची दखल घेतली असल्याची माहिती राज्याच्या कृषी मूल्य आयोगाचे अध्यक्ष पाशा पटेल यांनी दिली. संयुक्त राष्ट्रांचे सरचिटणीस अँण्टिनिओ गुट्रेस यांनी शाश्वत विकास, हवामान बदलाशी लढा आणि अन्न सुरक्षा सुनिश्चित करण्यासाठी तातडीनं पावलं उचलण्याचं आवाहन केलं होतं. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे

यांच्या नेतृत्वातील महाराष्ट्र सरकारनं या आवाहनाला सकारात्मक प्रतिसाद दिला; त्यामुळे या पुरस्कारासाठी महाराष्ट्राची निवड झाली आहे.

**अभिवादन**

थोर स्वातंत्र्यसेनानी लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांच्या पुण्यतिथीनिमित्त आणि लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त काल राज्यात सर्वत्र त्यांना आदरांजली वाहण्यात आली. राज्यपाल सी.पी. राधाकृष्णन यांनी काल पदभार स्विकारल्यानंतर विधानभवन इथं भेट देऊन छत्रपती शिवाजी महाराज, लोकमान्य टिळक आणि लोकशाहीर अण्णा भाऊ साठे यांना अभिवादन केलं. चैत्यभूमी इथं जाऊन भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या स्मृतींनाही त्यांनी  अभिवादन केलं. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांनीही लोकमान्य टिळक, आणि अण्णाभाऊ साठे यांना अभिवादन केलं. अण्णाभाऊ साठे यांना 'भारतरत्न' देण्याची मागणी करण्यासाठी आपण स्वतः पाठपुरावा करणार असल्याचं केंद्रीय सामाजिक न्याय राज्य मंत्री रामदास आठवले यांनी काल पुण्यात सांगितलं. या संदर्भात लवकरच पंतप्रधान आणि केंद्रीय गृहमंत्र्यांशी चर्चा करणार असल्याचं ते म्हणाले. मातंग समाज समन्वय समितीनं आयोजित केलेल्या अभिवादन सोहळ्यामध्ये ते बोलत होते. राज्यभरातल्या विविध शासकीय कार्यालयांमध्येही लोकमान्य टिळक आणि लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांना आदरांजली वाहण्यात आली.

**आर्टी**

लोकशाहीर अण्णा भाऊ साठे यांच्या साहित्यातून समाजात क्रांतिकारी परिवर्तन घडले आहे. जगण्यासाठी लढणाऱ्या माणसांकरता अण्णाभाऊंचं साहित्य दीपस्तंभासारखे आहे, असं प्रतिपादन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केले. अण्णा भाऊ साठे संशोधन आणि प्रशिक्षण संस्थेच्या कार्यालयाचं उद्घाटन काल मुंबईत त्यांच्या हस्ते झालं; त्यावेळी ते बोलत होते. यावेळी संकेतस्थळ, पोर्टल आणि  सहज शिक्षा ॲपचं उद्घाटनही करण्यात आलं.

**महसूल दिन**

एक ऑगस्ट हा दिवस दरवर्षी महसूल दिन म्हणून साजरा केला जातो. या निमित्त संपूर्ण राज्यात 1 ते 15 ऑगस्ट या कालावधीत महसूल पंधरवडा साजरा करण्याचं नियोजन करण्यात आलं आहे. वाशिम, अहमदनगर, सिंधुदुर्ग, रत्नागिरीसह सर्वत्र काल महसूल दिन साजरा करून महसूल पंधरवड्याचा प्रारंभ करण्यात आला.

**पॅरिस ऑलिंपिक**

महाराष्ट्राच्या स्वप्निल कुसाळेनं पॅरिस ऑलिंपिकमध्ये पुरुषांच्या 50 मीटर एअर रायफल थ्री पोझिशन या प्रकारात कास्य पदकाला गवसणी घातली. पॅरिस ऑलिंपिकम धलं नेमबाजीतलं हे तिसरं पदक आहे. कोल्हापूर जिल्ह्यातील कांबळ वाडी गावच्या स्वप्नीलनं मिळवलेल्या या ऐतिहासिक विजयानंतर कोल्हापूरातल्या त्याच्या राहत्या घरी काल जल्लोष करण्यात आला. स्वप्नीलने पुण्याच्या बालेवाडी इथल्या क्रीडा प्रबोधिनीमध्ये नेमबाजीचं प्रशिक्षण घेतलं आहे. खाशाबा जाधव यांच्यानंतर भारताला ऑलिम्पिकमध्ये वैयक्तिक पदक मिळवून देणारा; स्वप्नील, हा राज्यातला पहिला खेळाडू ठरला आहे. स्वप्नील कुसाळे याच्या यशाबद्दल त्याच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू, उपराष्ट्रपती जगदीप धनखड, पंतप्रधान नरेंद्र मोदी, यांच्यासह अनेक मान्यवरांनी त्याचं अभिनंदन केलं आहे.

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी स्वप्नीलशी दूरस्थ माध्यमातून संवाद साधला आणि त्याचं अभिनंदन केलं. या ऐतिहासिक कामगिरीसाठी स्वप्नीलला एक कोटी रुपयांचं पारितोषिक मुख्यमंत्र्यांनी जाहीर केलं. स्वप्नीलच्या प्रशिक्षक दिपाली देशपांडे त्याच्या यशाबद्दल बोलताना म्हणाल्या....

**प्रधानमंत्री पिकविमा**

प्रधानमंत्री पिक विमा योजने अंतर्गत राज्यात 1 कोटी 65 लाख 70 हजार 437 पीकविमा अर्ज दाखल झाल्याची माहिती कृषिमंत्री धनंजय मुंडे यांनी दिली. दरम्यान, राज्यात जुलै अखेर सुमारे 97 टक्के पेरणी पूर्ण झाली असून पीकविमा योजनेच्या माध्यमातून 1 कोटी 10 लाख 55 हजार हेक्टर क्षेत्र विमा संरक्षित करण्यात आलं आहे.

**पाऊस**

रत्नागिरी जिल्ह्यात पाऊस सुरूच आहे. जगबुडी नदी पुन्हा एकदा इशारा पातळीच्या वरून वाहू लागली आहे. सिंधुदुर्ग जिल्हयातही पावसाचा जोर वाढला असून दोडामार्ग तालुक्यातले सर्व नदी नाले दुथडी भरून वाहत आहेत. सावंतवाडीमध्ये घराची भिंत पडून दोन जण जखमी झाले. कोल्हापूर जिल्ह्यात धरण क्षेत्रात अजूनही अतिवृष्टी होत असून राधानगरी आणि वारणा धरणातून पाण्याचा विसर्ग वाढवण्यात आला आहे.

**हवामान**

येत्या 24 तासात कोकण आणि मध्य महाराष्ट्रात पावसाचा जोर वाढेल, घाट परिसरात तुरळक ठिकाणी मुसळधार पाऊस पडेल असा अंदाज हवामान विभागानं वर्तवला आहे.

## आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं.

## नमस्कार.